# बहुवार्षिक दरपत्रक (एमवायटी) याचिका

# कार्यकारी सारांश

# टाटा पॉवर - पारेषण

खटला क्रमांक २०१९ चा २९९

Lighting up Lives!

# कार्यकारी सारांश

## १.१. टाटा पॉवर- पारेषण ऐतिहासिक दृष्टीकोन:

१.टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ("टाटा पॉवर") ही १९१९ साली स्थापन झालेली कंपनी आहे. १ एप्रिल २००० रोजी टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० साली स्थापन झालेली) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापन झालेली) या दोन्ही कंपन्या टाटा पॉवरमध्ये विलीन करण्यात आल्या, उक्तनिर्देशित कंपन्यांचे परवानेही विलिन करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र शासनाने ठराव क्रमांक: आयईए-२००१/ सीआर-१०५०९/ एनआरजी, दिनांक १२ जुलै २००१ द्वारे आपल्या मुंबई परवाना क्षेत्रात वीजपुरवठा करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर वितरण परवानाधारकांना वीजपुरवठा करण्यासाठी अनुज्ञप्ती दिली.

२.उक्तनिर्देशत परवाने १५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वेध होते. त्यानंतर टाटा पॉवरच्या ट्रान्समिशन उद्योगाने (टाटा पॉवर-टी)ने खटला क्रमांक २०१४ चा ११२ मध्ये पारेषण परवाना प्रदान करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. माननीय आयोगाने १४ ऑगस्ट २०१४ रोजी टाटा पॉवरला पारेषण वाहिन्यांसाठी पारेषण परवाना आणि मुंबई क्षेत्रात आणि बाहेर टाटा पॉवरच्या मालकीची रिसिव्हिंग केंद्र (किंवा पारेषण रिसिव्हिंग केंद्रे) किंवा बांधण्याचे प्रस्तावित असलेली आणि टाटा पॉवरने भविष्यात मालकी घेणार असल्याचे अपेक्षित असलेली आणि महाराष्ट्राच्या आंतर राज्य पारेषण यंत्रणेचा १६ ऑगस्ट २०१४ पासून २५ वर्षांच्या कालावधीसाठी केद्रांना दिला.

३.माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्रमांक २०१४ चा १ मध्ये (पहिली दुरूस्ती) त्यांच्या १ ऑगस्ट २०१८ रोजीच्या खटला क्रमांक २०१६ चा १३७ मध्ये सुधारणा केली आहे.

## १.२. टाटा पॉवर ट्रान्समिशनचे कार्यान्वयन

४.टाटा पॉवर (टाटा पॉवर-टी)चा पारेषण व्यवसाय हा महाराष्ट्रातील पारेषण परवानाधारकांपैकी एक असून त्यांनी मुंबईत कार्यान्वयनाची १०० वर्षे पूर्ण केली आहेत. कार्यान्वयनाच्या या वर्षांमध्ये टाटा पॉवर टीने सातत्याने एक विश्वासू, तांत्रिकदृष्टया अद्ययावत आणि वर्गातील सर्वोत्तम पारेषण नेटवर्क मुंबईतील आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांसाठी उपलब्ध असेल याची काळजी घेतली आहे.

५.याशिवाय टाटा पॉवर टी टी राज्य पारेषण एककाची (एसटीयू)ची ग्रिडचे स्थैर्य, विश्वासार्हता आणि पारेषण नेटवर्कची क्षमता सुधारणा कायम राखण्यासाठी, तसेच मार्गांच्या हक्कांचे गंभीर प्रश्न सोडवणे, कायदेशीर प्रश्न सोडवणे, वैधानिक मान्यता वेगाने मिळवणे, डोंगराळ तसेच जंगल यांच्यासारख्या भौगोलिक अडचणी पार करणे, सीआरझेड निर्बंध, रेल्वे क्रॉसिंग, विमान मार्ग निर्बंध हे सर्व सोडवण्यासाठी भागीदार झाली आहे.

६. पारेषणाच्या नेटवर्कमध्ये निर्मिती केंद्रे आणि भार केंद्रांमधील महत्त्वाच्या जोडणीचा समावेश ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी केला जातो. पारेषण व्यवसाय एककात रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्यांचा समावेश असतो. टाटा पॉवर-टीची रिसिव्हिंग स्टेशन्स मुंबई आणि आसपासच्या परिसरात स्थित आहेत. ईएचव्ही भूमिगत वाहिन्या/ मार्गिकांसह विविध उच्च व्होल्टेजवर पारेषण वाहिन्या मुंबई आणि आसपासच्या परिसरात पसरलेल्या आहेत आणि त्या महाराष्ट्रात टाटा पॉवरच्या औष्णिक आणि जलविद्युत निर्मिती केंद्रांना जोडलेल्या आहेत. रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिनी नेटवर्क, ईएचव्ही केबल्ससह टाटा पॉवर टीच्या कौशल्यपूर्ण आणि प्रशिक्षित अभियंते तसेच कर्मचाऱ्यांकडून कार्यान्वयित केल्या जातात तसेच त्यांची देखरेख केली जाते.

७. मुंबई परवाना क्षेत्रातील पारेषण यंत्रणेला आयलँडिंग सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईबाहेर ग्रिडमध्ये बिघाड झाल्यास मुंबई ग्रिड वेगळे होते आणि मुंबईतील ग्राहकांना कोणत्याही अडथळ्याविना वीजपुरवठा मिळतो.

८. पारेषण नेटवर्कच्या विविध महत्त्वाच्या घटकांच्या संरक्षणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वाप केला जातो. त्यात मार्गिका, स्विचगियर आणि ट्रान्सफॉर्मर्स इत्यादींचा समावेश आहे. टाटा पॉवर-टीचे पारेषण नेटवर्क हे सुमारे १२०० सर्किट किमी आहे आणि त्यात १०० किलोवॅट आणि २२० किलोवॅट ओव्हरहेड मार्गिका तसेच एन-१ सपोर्टसह भूमिगत मार्गिकांचा समावेश असतो. यात २२ पारेषण रिसिव्हिंग स्टेशन्स स्थापित असून त्यांची एकत्रित पारेषण क्षमता ९८०२.५ एमव्हीए आहे.

९. लोकांच्या सुरक्षिततेला सर्वाधिक प्राधान्य देत असताना टाटा पॉवर-टीने तंत्रज्ञानातील बदल आणि भारातील वाढ यांच्याशी सुसंगती राखली आहे. पारेषण मार्गिकांच्या क्षमतेत तसेच ट्रान्सफॉर्मर्समध्ये वाढ, स्विचगियरची भर, अद्ययावत ऑपरेटिंग आयटी यंत्रणांचा समावेश, दीर्घकालीन मालमत्ता नादुरूस्त होण्यापूर्वी बदलणे यांचे योग्य पद्धतीने नियोजन केले जाते आणि आगाऊ स्वरूपात काम केले जाते. त्याची अंमलबजावणी कार्यान्वयनात सर्वोच्च दर्जाची सुरक्षितता राखण्यासाठी तसेच पारेषण नेटवर्कच्या विश्वासार्हतेसाठी केली जाते.

१०. पारेषण वाहिन्या आणि उपकरणांच्या स्थानिक आणि मानवी कार्यान्वयनाशिवाय टाटा पॉवरने पारेषण नेटवर्कमध्ये 'निरीक्षण नियंत्रण आणि माहिती ताबा यंत्रणा' (स्काडा) स्थापित केली आहे आणि ती आपल्या सर्व रिसिव्हिंग केंद्रांच्या प्रत्यक्ष स्वरूपातील दूरस्थ निरीक्षण आणि नियंत्रणासाठी पॉवर सिस्टिम कंट्रोल सेंटर (पीएससीसी)कडून चालवली जाते. यामुळे कार्यान्वयन वेगवान होते आणि दूरस्थ कार्यान्वयनांमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यास पारेषण यंत्रणा वापरकर्त्यांना (टीएसयू)चा प्रवाहाचा वेळ कमी होतो.

११. टाटा पॉवर-टी ही सुरक्षितता, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण शाश्वतता यांच्याप्रति वचनबद्ध आहे. या संदर्भातील विविध उपक्रम दरवर्षी मुंबईतील विविध कार्यान्वयन ठिकाणी यशस्वीरित्याआयोजित केले जातात आणि पार पाडले जातात.

१२. टाटा पॉवर-टी कायम कोणत्याही प्रकारच्या अडथळा निर्माण करणाऱ्या घटनांची हाताळणी पूर्ण काळजीने आणि जास्तीत जास्त वेगाने करण्याचा प्रयत्न करते आणि ती मानवी जीव वाचवणे आणि पर्यावरणाचे नुकसान होऊ नये यासाठी तसेच आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्नशील असते. भूकंप, पूर, आग, मोठ्या उपकरणाचे अपघाती बंद पडणे, दंगली आणि दहशतवादी हल्ला यांच्यासारख्या आपत्कालीन परिस्थितींच्या वेळी हाताळणी करण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन योजना आणि आपत्कालीन व्यवस्थापन चमू अस्तित्वात आहे.

१३. मागील काही वर्षांत टाटा पॉवर-टीच्या पारेषण यंत्रणांची व्याप्ती आणि प्रसार यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता १ : टाटा पॉवर-टी नेटवर्क तपशील**

| निकष | एकक | आर्थिक वर्ष २०१४-१५ | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|
| २२० केव्ही लाइनची एकूण लांबी | सीकेटी. किमी | ४०१ | ४११ | ४१६ | ४१६ | ४१७ |
| २२० केव्ही मार्गिकांची एकूण संख्या | संख्या | ८२ | ८८ | ८८ | ८८ | ८८ |
| ११० केव्ही मार्गिकांची एकूण लांबी | सीकेटी किमी | ७७३ | ७८८ | ७६९ | ७६९ | ७८३ |
| ११० केव्ही मार्गिकांची एकूण संख्या | संख्या | २७८ | २८२ | २७४ | २८० | २९० |
| २२०/११० केव्ही ईएचव्ही उपकेंद्र | संख्या | २१ | २१ | २१ | २१ | २२ |

१४. पारेषण मार्गिका उपलब्धता- टाटा पॉवर टी मागील अनेक वर्षांपासून ग्रिड उपलब्धता सातत्याने ९९.४५ टक्के किंवा अधिक साध्य करत आहे. जास्त ग्रिड उपलब्ध असल्यास टीएसयूला आणि मुंबई परवाना क्षेत्रात जास्त प्रमाणात वीजपुरवठा उपलब्ध होणे होय. टाटा पॉवर-टीमध्ये ग्रिडची उपलब्धता टीएसयूसोबत समन्वय साधून नियोजबद्ध वीजपुरवठा खंडित करणे, मार्गिकांचे आणि उपकरणांचे परिणामकारक प्रतिबंधात्मक देखरेख जेणेकरून सक्तीचा वीजपुरवठा बंद होणे आणि वारंवार बंद होणे अशा घटना टाळता येतात.

**तक्ता २- टाटा पॉवर टी नेटवर्कची पारेषण ग्रिड उपलब्धता**

| आर्थिक वर्ष | टाटा पॉवर-टी ग्रिड उपलब्धता टक्क्यांमध्ये |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१४-१५ | ९९.६५ टक्के |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ | ९९.४५ टक्के |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ | ९९.६३ टक्के |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | ९९.४८ टक्के |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | ९९.५० टक्के |

## १.३. सादर केलेल्या एमवायटी याचिकेअंतर्गत सादरीकरणे

१५. टाटा पॉवर-टीने आपल्या सादर केलेल्या एमवायटी याचिकेत विविध वर्षांसाठी खालीलप्रमाणे सादर केले आहे:

- एमईआरसी (एमवायटी) नियमावली २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी समायोजन
- एमईआरसी (एमवायटी) नियमावली २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी समायोजन
- एमईआरसी (एमवायटी) नियमावली २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तात्पुरते समायोजन
- आर्थिक वर्ष २०१९-२० च्या शेवटी तफावत/ (अतिरिक्त)
- एमईआरसी (एमवायटी) नियमावली २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एआरआर अंदाज
- सूचनांच्या पूर्ततेची स्थिती

## १.४. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी समायोजन

१६. टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी खर्चाचा ताळेबंद फायदा आणि नुकसानाच्या वाटपासाठी केलेल्या तडजोडींसह खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ३ : आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१७-१८ ची मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता फायदा/ (नुकसान) | अनियंत्रणयोग्य घटक | नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता फायदा/ (नुकसान)च्या परिणामांनंतर निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| I | महसूल | | | | | |
| | - पारेषण शुल्क | | ६६१.६८ | | | ६६१.६८ |
| | -वजा रोख सवलत | | | | | २.८९ |
| | - अधिक दरेतर उत्पन्न | १८.११ | १४.५८ | | | १४.५८ |
| II | **एकूण महसूल** | | ६७६.२६ | | | ६७३.३७ |
| | | | | | | |
| II | **खर्च** | | | | | |
| १. | कार्यान्वयन आणि देखरेख खर्च | १८५.६३ | १८८.५९ | २५.१४ | ०.०० | १६३.४५ |
| २. | घसारा | १३७.५५ | १३१.०८ | | | १३१.०८ |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | ९२.६३ | ९२.५९ | | | ९२.५९ |
| ४. | चालू भांडवलावर व्याज | १३.२२ | १३.२२ | १.१३ | | १२.०९ |
| ५. | पुनर्वित्त आणि इतर वित्तीय शुल्क | ०.०० | २.२२ | | | २.२२ |
| ६. | सवलत | ०.०० | २.९७ | | | २.९७ |
| ७. | आपत्कालीन साठा | ७.८७ | ७.८७ | | | ७.८७ |
| ८. | प्राप्तीकर | २१.२३ | ५५.३६ | | | ५५.३६ |
| ९. | समभागांवर परतावा | १६३.९३ | १६४.८५ | | | १६४.८५ |
| II | **एकूण खर्च** | ६२२.०५ | ६५८.७४ | | | ६३२.४७ |
| | | | | | | |
| III | **निव्वळ तफावत/ अतिरिक्त आर्थिक वर्ष २०१७-१८ (I- II) साठी** | | | | | -४०.९० |

१७. वरील तक्त्यावरून असे दिसते की आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी **अतिरिक्त ४०.९० कोटी** रूपये आहे आणि त्याचे गणन आर्थिक वर्ष २०१७-१८ दरम्यान आलेला महसूल आणि फक्त आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये झालेला खर्च यांच्यातील तफावत आहे.

## १.५. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी समायोजन

१८. आर्थिक वर्ष २०१८-१९ दरम्यान माननीय आयोगाच्या सूचना तसेच एसटीयू शिफारशींनुसार टाटा पॉवर-टीने जून २०१८ ते मार्च २०१९ दरम्यान सहाय्यभूत वापर मुंबई परवाना क्षेत्रातील आपल्या सर्व रिसिव्हिंग केंद्रांसाठी नोंदवला आहे जिथे या रिसिव्हिंग केंद्रांसाठी सहाय्यभूत वापर टाटा पॉवर-डीने केला आहे. अशा सर्व रिसिव्हिंग केंद्रांसाठी या कालावधीसाठी मोजण्यात आलेला सहाय्यभूत वापर **०.७९ एमयू** आहे.

१९. त्यानुसार, टाटा पॉवर-टीने माननीय आयोगाला **१०.५२ कोटी** रूपये विचाराधीन घेऊन आपल्या रिसिव्हिंग केंद्रांचा सहाय्यभूत वापरासाठी आलेला खर्च आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी आणि पुढील वर्षांसाठी योग्य पद्धतीने ओअँडएम खर्च मान्यताप्राप्त करताना समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

२०. याशिवाय, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी टाटा पॉवर-टीसाठी खर्चाची आकडेवारी आणि नफा आणि तोट्याच्या वाटपासाठी केलेल्या तडजोडींसह खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता४ - आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ ची मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता फायदा/(नुकसान) | अनियंत्रणयोग्य घटक | नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता फायदा/(नुकसान)च्या परिणामांनंतर निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| I | **महसूल** | | | | | |
| | - पारेषण शुल्क | | | | | ६०४.८० |
| | -वजा रोख सवलत | | | | | १.४५ |
| | - दरेतर उत्पन्न | १६.८३ | | | | १२.२७ |
| II | **एकूण महसूल** | | | | | **६१५.६२** |
| | | | | | | |
| II | **खर्च** | | | | | |
| १. | कार्यान्वियन आणि | १७९.१८ | २०५.२० | -२.३३ | ०.०० | २१८.०४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | देखरेख खर्च | | | | | |
| २. | घसारा | ११७.५९ | १३८.२७ | | | १३८.२७ |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १०३.०८ | ९१.८५ | | | ९१.८५ |
| ४. | चालू भांडवलावर व्याज | १२.४१ | १२.४८ | -०.७२ | | १३.२० |
| ५. | पुनर्वित्त आणि इतर वित्तीय शुल्क | ०.०० | ०.०६ | | | ०.०६ |
| ६. | सवलत | ०.०० | ३.३७ | | | ३.३७ |
| ७. | आपत्कालीन साठा | ७.४३ | ८.३७ | | | ८.३७ |
| ८. | प्राप्तीकर | ६६.७४ | ३३.२४ | | | ३३.२४ |
| ९. | समभागांवर परतावा | १५५.३८ | १७७.२८ | | | १७७.२८ |
| II | एकूण खर्च | ६४१.८२ | ६७०.१३ | | | ६८३.६९ |
| | मागील वसुली | | | | | |
| III | निव्वळ तफावत/ अतिरिक्त आर्थिक वर्ष २०१८-१९ (I- II) साठी | | | | | ६८.०७ |

२१. वरील तक्त्यातून असे दिसून येते की आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी **६८.०७ कोटी** रूपयांची तफावत आहे जी, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये कमावलेला महसूल आणि फक्त आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये केलेल्या खर्चामधील अंतर आहे..

## १.६. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तात्पुरते समायोजन

२२. आर्थिक वर्ष २०१९-२० च्या एआरआरसोबत टाटा पॉवर-टीने एक टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगातून टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाकडे विशिष्ट मालमत्तांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात आणि आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये त्याचा आर्थिक परिणाम यांच्यासंदर्भात एक तपशीलवार सादरीकरण केले आहे.

२३. आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचा एआरआर सुधारित सुरूवातीचा जीएफए, मालमत्तांच्या हस्तांतरणामुळे समभाग आणि कर्ज यांचा विचार करून काढण्यात आला आहे आणि तो खाली सादर करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मालमत्तांचा समावेश/ निवृत्ती या गोष्टी टाटा पॉवर-टीच्या मालमत्तेतील भर म्हणून विचारात घेण्यात आल्या आहेत. याशिवाय मालमत्तेतील भर केल्यामुळे ओअँडएम खर्चावरील परिणामही विचारात घेण्यात आला आहे. टाटा पॉवर-टी एआरआरमधील भर टाटा पॉवर-जी आणि टाटा पॉवर-डीच्या एआरआरमधून वजा केली जाईल.

२४. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तात्पुरती तफावत/ (अतिरिक्त) खाली सादर केल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ५: आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | निव्वळ पात्रता |
|---|---|---|
| I | **महसूल** | ७१५.४२ |
| | - पारेषण शुल्क | ७०३.१५ |
| | -दरेतर उत्पन्न | १२.२७ |
| II | **एकूण महसूल** | ७१५.४२ |
| II | **खर्च** | |
| १ | कार्यान्वयन आणि देखरेख खर्च | २५६.०९ |
| २ | घसारा | १६०.११ |
| ३ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | ११०.४३ |
| ४ | चालू भांडवलावर व्याज | १४.२७ |
| ५ | इतर वित्तीय शुल्क | ०.०० |
| ७ | आपत्कालीन साठा | ९.३९ |
| ८ | प्राप्तीकर | ३३.२४ |
| ९ | समभागांवर परतावा | २०३.०९ |
| II | **एकूण खर्च** | ७८६.६३ |
| III | **निव्वळ तफावत/ अतिरिक्त आर्थिक वर्ष २०१९-२० (१-२) साठी** | ७१.२१ |

२५. वरील तक्त्यातून असे दिसते की आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अंदाजित महसूल आणि फक्त आर्थिक वर्ष २०१९-२० साठी खर्चातील तफावतीच्या स्वरूपात **७१.२१ कोटी** रूपयांचे अंतर मोजण्यात आले आहे.

**१.७. मागील वसुलींसह एआरआर**

२६. उक्तनिर्देशित मान्यताप्राप्त अतिरिक्त रकमांवर आधारित, मागील कालावधीतील वसुली (आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी ब्रॅंड समभागांचा परिणाम) आर्थिक वर्ष २०१७-१८ आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी प्रत्यक्ष तफावत/ (अतिरिक्त) आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी सुधारित एआरआरचा विचार करता भविष्यातील दरपत्रकासाठी मागील वसुलींची एकूण रक्कम खाली सादर केल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ६: आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी ब्रँड समभागांचा परिणाम**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| १. | निकषात्मक ओअँडएम खर्च | अ | १९७.२३ | १७६.०५ |
| २. | कर्मचारी खर्च | ब | ८२.६५ | ८८.४३ |
| ३. | एअँडजी खर्च (ब्रँड समभाग गणनाशी तडजोड केल्यावर) | क | ५२.३८ | ५९.४३ |
| ४. | आरअँडएम खर्च | ड | २३.५९ | १९.६७ |
| ५. | वजा: शतक महोत्सव | ई | -०.७५ | -०.११ |
| ६. | प्रत्यक्ष कार्यान्वयन आणि देखभाल खर्च (भांडवलीकरणाच्या निव्वळ) | फ= ब+क+ड+ई | १५७.८७ | १६७.४१ |
| ७. | टाटा पॉवर टी ने राखलेला फायदा/ (नुकसान) | ग | २६.२४ | २.८८ |
| ८. | निव्वळ हक्क | च=फ+ग | १८४.११ | १७०.२९ |
| ९. | एमटीआर आदेशात अनुज्ञेय केलेली एकूण ओअँडएम हक्क | य | १८३.५१ | १६९.१९ |
| **१०.** | **वाढीव तफावत** | **ज =च - य** | **०.६०** | **१.१०** |

२७. व्याजाचे गणन खालील तक्त्यात सादर केल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ७: आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये तफावतीच्या वसुलीसाठी व्याज गणन**

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| **राखण्याचा खर्च दर** | अ | १४.७५ | **१०.७९ टक्के** | **१०.१८ टक्के** | **९.८९ टक्के** | **९.८० टक्के** |
| सुरूवातीची शिल्लक | ब | | ९३.६६ | ९४.७६ | ५०.८९ | ०.४९ |
| या वर्षात पडलेली भर | क | ९३.६६ | १.१० | (४०.९०) | (४७.०३) | ७१.२१ |
| वजा प्रोत्साहन | ड | | | २.९७ | ३.३७ | |
| अंतिम शिल्लक | ई=(ब+क-ड) | ९३.६६ | ९४.७६ | ५०.८९ | ०.४९ | ७१.६९ |
| सुरूवातीची राखण्याची किंमत | फ =(अ *ब) | | १०.११ | ९.६५ | ५.०३ | ०.०५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बेरजेवर राखण्याची किंमत | ग =(अ *क/२) | ६.९१ | ०.०६ | (२.०८) | (२.३३) | |
| **राखण्याची किंमत** | **च =( इ+ फ)** | ६.९१ | १०.१६ | ७.५६ | २.७१ | ०.०५ |
| **एकूण राखण्याची किंमत** | **य** | | | | | २७.३९ |

## तक्ता ८: आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मागील तफावतीच्या वसुलीसाठी व्याज गणन

कोटी रूपये

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरूवातीची शिल्लक | अ | | ९३.६६ | ९४.७६ | ५३.८६ | ६.८३ | ७८.०४ |
| वर्षादरम्यान तफावत/ (अतिरिक्त) | ब | ९३.६६ | १.१० | (४०.९०) | ६८.०७ | ७१.२१ | |
| एमटीआर आदेश २०१७ चा २०४ मध्ये मान्यताप्राप्त केलेली महसुली तफावत/ (अतिरिक्त) | क | | | | (११५.१०) | | |
| मागील वसुलीवर व्याज | ड | | | | | | २७.३९ |
| अंतिम शिल्लक | ई=अ+ब+क+ड | ९३.६६ | ९४.७६ | ५३.८६ | ६.८३ | ७८.०४ | १०५.४३ |
| **आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये मागील वसुली** | **फ = ड+ई** | | | | | | १०५.४३ |

२८. एमवायटी नियमावली २०१९च्या कलम ५७.१० अंतर्गत नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षासाठी पारेषण परवान्याच्या एकूण महसुलाच्या वसुलीची तरतूद देते, जी आयोगाच्या मान्यतेनुसार असते आणि त्यात एआरआर घटकांचा समावेश असतो.

## १.८. आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एकूण महसुली आवश्यकता

२९. सादर केलेल्या याचिकेतील विविध घटकांमधील अंदाजांवर आधारित राहून टाटा पॉवर-टीची आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एकूण महसुली आवश्यकता खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ९: आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक पारेषण शुल्क**

कोटी रूपये

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित |
| ओअँडएम खर्च | २६२.७१ | २७४.९३ | २९३.५९ | ३०८.४१ | ३२२.४५ |
| दीर्घकालीन कर्जावर व्याज | १२९.७१ | १४३.०३ | १५३.७५ | १६१.४३ | १६४.८२ |
| चालू भांडवलावर व्याज | १६.८९ | १८.३९ | १९.९६ | २१.३७ | २२.६२ |
| घसारा | १८२.२८ | २०१.७४ | २२०.५८ | २३८.४८ | २५४.५४ |
| समभागांवर परतावा | २६३.५९ | २९०.०३ | ३१५.६३ | ३३९.९४ | ३६१.७६ |
| आपत्कालीन साथ्यात योगदान | १०.९५ | १२.२१ | १३.४३ | १४.६१ | १५.७० |
| **वार्षिक पारेषण शुल्क** | **८८६.१३** | **९४०.३३** | **१०१६.९४** | **१०८४.२३** | **११४१.९०** |
| वजा: दरेतर उत्पन्न | १२.२७ | १२.२७ | १२.२७ | १२.२७ | १२.२७ |
| **एकूण पारेषण शुल्क** | **८५३.८६** | **९२८.०६** | **१००४.६६** | **१०७१.९६** | **११२९.६२** |

३०. याशिवाय आधीच्या विभागात गणन केल्याप्रमाणे मागील वर्षासाठी तफावत/ (अतिरिक्त) यांचा विचार करता, आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक पारेषण शुल्क खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १०: मागील वर्षासाठी तफावत/ (अतिरिक्त) विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंत मागील वसुली | १०५.४३ | | | | |
| २. | एकल एआरआर | ८५३.८६ | ९२८.०६ | १००४.६६ | १०७१.९६ | ११२९.६२ |
| ३. | **एकूण एआरआर** | **९५९.२९** | **९२८.०६** | **१००४.६६** | **१०७१.९६** | **११२९.६२** |

## १.९. माननीय आयोगाला विनंती

वरील दृष्टीकोनातून पाहता, याचिकाकर्ता माननीय आयोगाकडे विनंती करत आहे की:

- आर्थिक वर्ष २०१७-१९, आर्थिक वर्ष २०१८-१० आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तात्पुरते समायोजन आणि सदर याचिकेत गणन करण्यात आलेली मागील तफावत/ (अतिरिक्त) एमवायटी नियमावली २०१५ मध्ये तसेच २९ नोव्हेंबर २०१७च्या पहिल्या दुरूस्तीमध्ये नमूद मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार स्वीकारण्यात यावे.
- आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी एकूण महसुली आवश्यकतेचे अंदाज या याचिकेत एमवायटी नियमावली २०१९ नुसार आखण्यात आल्यानुसार स्वीकारणे.
- टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगाकडून टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाकडे आणि टाटा पॉवरच्या वितरण उद्योगाकडून टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाकडे पारेषणाशी संबंधित विशिष्ट मालमत्तांचे हस्तांतरण करण्याची अनुमती देणे.
- एमएसईटीसीएलला (एसटीयू) ''विक्रोळी येथील ४०० केव्ही रिसिव्हिंग स्टेशन''मध्ये विकास पूर्व खर्चासाठी लागू असल्यानुसार पुढे नेण्याच्या खर्चासोबत **१३५.५५ कोटी** रूपयांचा परतावा करण्याच्या सूचना देणे.
- कोणत्याही प्रकारच्या नजरचुकीमुळे वगळणूक/ चुका/ समायोजनातील तफावती/ त्रुटी माफ करणे आणि टाटा पॉवर-टीला सदर याचिकेत भर टाकण्याची/ बदल/ सुधारणा/ फेरबदल करण्याची तसेच पुढील तारखेला आवश्यकतेनुसार पुढील सादरीकरण करण्याची परवानगी देणे.
- प्रकरणाशी संबंधित तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेऊन माननीय आयोगाला योग्य आणि अचूक वाटतील असे पुढील आणि इतर आदेश पारित करणे.

**-एसडी-**

(पियूष टंडन)

प्रमुख- नियामक,

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड